# ।। ॐ श्री साईराम ।।
# प्रश्नोत्तरांच्या सत्रात आपले स्वागत
## प्रश्न क्र. ९१

आज सकाळी आम्हाला जो प्रश्न मिळाला तो खूपच कुतुहलजनक आहे. देवाच्या समोर असताना काय घडतं? दैवी प्रवचन ऐकतो तेव्हा काय होतं? आपण भजन गात असताना काय होतं? असा हा प्रश्न आहे.

अर्थातच या तीन प्रश्नांची उत्तरं माझ्याकडून अपेक्षित आहेत. तथापि उत्तर मात्र एकच असेल. कृपया लक्षात घ्या, जेव्हा तुम्ही देवाच्या समोर असता, त्याचे दैवी संभाषण ऐकत असता किंव भजन गात असता तेव्हा तुमची स्थिती कशी असते, तुम्हाला काय जाणवत असतं? त्याची नोंद करा. तुमची सजगपणाची वृत्तीच ह्या तीनही प्रश्नांची उत्तरं तुम्हाला देईल.

मी तुम्हाला हे सांगू शकतो की आपण जे ऐकत असतो, त्यातील शब्दांमध्ये अगदी थोडं अंत असतं. आपण पुस्तकात जेव्हा वाचत असतो, त्यातील दोन ओळींमध्ये किंवा भजन म्हणताना थोडे अंतर असते, त्या शांततेत आपल्याला त्यांचा खरा अर्थ सापडतो.

जास्त स्पष्ट करून सांगताना मी असं म्हणेन, साई वाङ्मयातील थोड्या ओळी वाचून होतात तेवढ्यात आपण स्वत:ला हरवून जातो. ते पुस्तक बाजूला ठेवून आपण काय वाचले यावर आणि आपल्याला काय सांगितलं गेलं यावर विचार करू लागतो. पुस्तकातल्या ओळी आपल्याला दिसत नाहीशा होतात. त्या वेळेला आपल्याला या ओळींमधील शांततेच्या काळात त्याचा अर्थ समजतो. ह्या शांततेच्या वेळात आपल्याला त्यातील खरा अर्थ समजण्यास आणि लक्षात येण्यास सुरुवात होते.

स्वामी जेव्हा मुलाखतीच्या वेळी बोलतात, तेव्हा आपण त्यांचा शब्द न् शब्द अगदी लक्षपूर्वक ऐकत असतो आणि अचानक त्या शब्दांच्या मध्ये एक किंचित शांततेचा काळ येतो, त्यावेळी त्या शब्दांचा खरा अर्थ समजतो. दुसऱ्या शब्दात सांगायचं म्हणजे जे वाचलेलं असतं, जे ऐकलेलं असतं, त्याचा खरा अर्थ ती शांतताच सांगून टाकते.

खरं म्हणजे आपण अमृतपान करत असतो. म्हणूनच बाबांनी सांगितलं की गीता कशी वाचावी? ते म्हणाले, गगीतानुथियागी, तुम्ही तिचं प्राशन केलं पाहिजे. थिआगी, तुम्ही प्राशन केलं पाहिजे आणि मगच तुम्ही त्यागी व्हाल, म्हणजे त्याग करणारा माणूस व्हाल. ती वाचणं सोपं नाही मुळीच नाही! ती तुम्ही प्राशन करायला हवी मगच तुम्ही त्यागी बनाल.

म्हणून ती गीता नुसती वाचून पुरेसं नाही, जे जे वाचाल ते पिऊन घेतलं पाहिजे आणि तेव्हाच आपल्याला समजेल की कुठलंही पुस्तक आपण मन:पूर्वक, मनापासून वाचू शकत नाही, नाही. जे काही आपण मनातून वाचतो, ते म्हणजे ती एक विचार करण्याची प्रक्रिया, माहिती होण्याची, जाणून घेण्याची चौकस बुद्धी असते, एवढेच! त्यापेक्षा जास्त काहीही नाही. पण जेव्हा तुम्ही अंत:करणापासून वाचता, त्यावेळी तुम्ही जे वाचले त्यातील प्रत्येक शब्दाचा आस्वाद घेता, त्याचा अर्थ लक्षात घेता.

आणि त्यातील भावना समजतात, मग ते भजन म्हणत असू किंवा प्रवचन ऐकत असू, किंवा एखादं पुस्तक वाचत असू तेव्हा त्यातील भावना समजतात. ती भावना आपल्या मनातूनच निर्माण होते की मी हे आधीच करायला पाहिजे होतं किंवा आधीच हे पुस्तक वाचायला हवं होतं. मी ह्या उन्नत अवस्थेला आधीच का पोचलो नाही? मी ह्या गोष्टी आधीच का समजावून घेतल्या नाहीत? अशी भावना तुमच्या ठिकाणी निर्माण होते. तुम्ही जे काही करत आहात त्याचा अर्थ समजणं हाच मुळी त्या गोष्टीचा पुरावा आहे.

इतकंच नाही तर आपण साई वाङ्मय वाचतो तेव्हा काय घडतं? तुम्हाला जाणवतं की तुमची उन्नती होत आहे आणि तुमच्या मनाच्या सीमा, मर्यादांच्याही पलीकडे उंचावर पोचल्या आहेत. आपलं मन संकुचित असतं, आपलं मन बंधनात असतं, त्याला त्याच्या स्वत:च्या मर्यादा, सीमा असतात. पण जेव्हा आपण बाबांचं वाङ्मय वाचतो, तेव्हा त्याला जराही बंधन नसतं कारण साईवाङ्मय, प्रवचने आपल्याला त्या जुन्या-पुराण्या सीमांपलीकडे घेऊन जातात, जणू काही सबंध आकाश तुमच्या पुढे आहे, तुम्हाला मिळाल्यासारखेच आहे. आतापर्यंत तुम्ही एका लहान खोलीत असता, लहान जागेत असता किंवा एखाद्या फुग्यातील लहानशा जागेत असता, त्यातून तुम्ही बाहेर आलात की सर्व जागा तुमच्यासाठी मोकळी होते. तशी तुमची भावना होते. तुम्ही त्यानंतर संकुतिच मनाचे राहत नाही.

आणि दुसऱ्या एका गोष्टीचा अनुभव मिळतो. खरं म्हणजे आपण जास्त बंधनात असल्याची, एखाद्या तुरुंगात असल्याची जाणीव होते. तुरुंग म्हणजे दारे बंद असलेली, चार भिंतींनी वेढलेली एक कोठडी असते. याचा एवढाच अर्थ की खुंटलेली वाढ.

याचा फक्त एकच अर्थ की बाहेरच्या जगापासून बंदिस्त असलेले जीवन, एकटेपणाचे जीवन म्हणजेच तुरुंग! अशा तऱ्हेने आपले आपणच बंदिवान झालेले असतो. म्हणजेच कैद करणारा आणि कैदी झालेला तो मीच असतो. आपल्याला कोणी दुसऱ्याने कैदेत टाकलेले नसते. आपणच आपल्याला कळत-नकळत स्वत:ला कैद करून घेतो. म्हणजेच मी तुरुंगाधिकारी आणि मीच तुरुंगवासी असतो. कारण हे सर्व मीच करणारा असतो. मला दुयऱ्या कोणी असं ठेवलेलं नाही. ही कोणाचीही इच्छा नव्हती, विचार नव्हता आणि इतक्या संकुचित, मर्यादित विचार करायला कोणी मला हे असं ठेवलेलं नाही. नाही. हे माझंच काम आहे.

पण आज जेव्हा मी साईवाङ्मय वाचतो, तेव्हा मी आनंदाचा, शांतीचा आणि उमजलेपणाचा अनुभव घेतो. होय, मी आनंद आणि आनंदाचाच अनुभव घेतो, आणि शांततेला आमंत्रित करतो. तुम्हाला शांतता हवी असते. का? कारण साई वाङ्मयातून पाठवल्या गेलेल्या संदेशातून तुम्हाला तो खोल, विशाल पसरलेला आनंद तुम्ही अनुभवत असता.

दुसऱ्या शब्दात सांगायचं म्हणजे हे वाद्यांशिवाय असलेलं संगीत आहे. ते शब्दांवाचून असलेलं गाणं आहे, कारण ते त्या शांततेच्या काळातच फक्त घडलेलं असतं. हे फक्त शांततेतच घडतं, शब्दांशिवाय गीत, वाद्यांवाचून संगीत घडतं. होय.

म्हणून आतापर्यंत, खरं बोलायचं तर आपण फक्त देहाने जगत असतो एवढंच. पण जेव्हा साईंच्या शिकवणुकीचे वाङ्मय, साईंचे संदेश यांचा परिचय झाला, तेव्हा माझ्या हृदयाची दारे उघडली. मी त्या तुरुंगातून बाहेर आलो आणि मला ते विस्तीर्ण अवकाश मिळाले आणि माझ्या असंही लक्षात आलं की माझ्या अंतर्मनातील समतोलपणा आहे आणि हा अंतर्मनातील समतोलपणा म्हणजेच ध्यानधारणा. तर संपूर्ण समतोलपणामुळे मी विचलीत झालो नाही, एखाद्या लहानशा गोष्टीमुळे मी पूर्वी त्रासून जात असे तसा आता जात नाही. मी अशांत, चिडलेला नसतो. मी समचित्त राहायला आणि मनन करायला शिकलो. मी अस्वस्थ होत नाही. त्यांचे वाङ्मय वाचल्यामुळे हा परिणाम मला अनुभवता येतो. साई वाङ्मय हे एक विशिष्ट वाङ्मय आहे कारण ते थेट हृदयाला जाऊन भिडते. होय, साईंचा संदेश थेट हृदयापर्यंत जाऊन पोचतो. हे एक रहस्यच आहे.

आणि भगवानांच्या सान्निध्यात, आपण जेव्हा त्यांच्या संधी देण्यावर आणि कृपेवर विसंबून, खूप वेळ बसून राहतो तेव्हा आपल्या श्वासोछ्श्वासात एक प्रकारचा सुंदर मिलाप झाल्याचं जाणवतं. आपल्या श्वासोछ्श्वासाच्या प्रक्रियेवर त्याचा परिणाम होतो आणि इतकंच नाही तर आपल्या जाणीवेवरही त्याचा परिणाम होतो. त्याचा आपल्या जाणीवेवर परिणाम होतो तेव्हा देदिप्यमान, भव्य शांतता निर्माण होते, त्याच्या आनंदाच्या अनुभवाची स्थिती निर्माण होते.

म्हणून साईसंदेश म्हणजे फक्त भाषण नसतं. तर ते आपल्या जाणीवांना आवाहन करते आणि आपल्याला शांततेच्या काळात घेऊन जाते आणि आनंदाची स्थिती मिळवून देते.

आणि आपण जेव्हा त्यांचे भाषण ऐकतो किंवा वाचतो, तेव्हा आपण जराही दु:खी राहत नाही. जराही चिंताग्रस्त राहत नाही. का? भूतकाळ हा भूतकाळातच जमा होतो, भूतकाळ हा परतून येणारा नसतो. आपल्या भूतकाळाविषयी पश्चात्ताप करायला नको, किंवा खेदही करायला नको. नकोच! भूतकाळाला विसरून जा कारण आपण वर्तमानकाळात जगत असतो आणि हा वर्तमानकाळच आपल्या बगिच्यातील सुंदर फुलांना न्याहाळण्याचा आहे.

आणि हाच तो शांततेचा परिणाम असतो. हो! हे सर्व खूप आश्चर्यकारक असते आणि आपल्याला मिळणाऱ्या आनंदाचे हेच ते कारण असते. आपल्यात आतून सुंदर संगीत निर्माण होते. तो काही एखादा रंगभूमीवरचा प्रयोग नसतो. किंवा संगीताचा कार्यक्रम नसतो. एक अनामिक नि:शब्द ताल, एक प्रकारची कंपने तुमच्या आतच एक मंद संगीत तुम्ही अनुभवता. हे संगीत तुमच्या आतमध्ये असा आनंद निर्माण करते, जसे तुम्ही सूर्यास्ताच्या शांत वेळी अनुभवता. असाच अनुभव तुम्हाला फुलांच्या सुगंधातून मिळत असतो. सुंदर, मोहक सुवास!

म्हणून तुम्ही स्वत:चे निरीक्षण करा, तुम्ही त्यांचं वाङ्मय वाचता, त्यांचं दैवी संभाषण ऐकता, त्यांची कार्यं पाहता, तेव्हा काय घडतं? तुम्ही त्यांचं दैवी प्रवचन ऐकत असताना, जेव्हा तुम्ही भजनात रंगून जाता तेव्हा तुमच्यात काय घडतं? त्यातच तुम्हाला उत्तर मिळेल. तुमचा अनुभव, तुमची तीव्र एकाग्रता, त्याबद्दलचे निरीक्षण यातच तुम्हाला स्वत:ला समाधानकारक उत्तर मिळवून देईल.

आणखी एक गोष्ट अशी की आपण कसलीही अपेक्षा ठेवू नये. कुठल्याही प्रकारची अपेक्षा ठेवू नये. तेव्हाच त्यातील सौंदर्य, नृत्य आणि संगीत यांचा आस्वाद घेऊ शकाल. ज्याप्रमाणे तुम्ही सगळीकडे लक्ष देऊन त्यातील येणाऱ्या लाटांकडे पाहताना आनंद घेता तसा आनंद! तुम्हाला अपेक्षा न ठेवताही पूर्ण चंद्राकडे पाहण्याचा आनंद घेता येईल.

म्हणून अशा प्रकारे कोणत्याही अपेक्षा न बाळगता आनंद मिळवण्यात तुम्हाला काही प्रमाणात मी सहभागी होऊ शकतो.

तेव्हा तीन भागांचा समावेश असलेल्या प्रश्नांचे उत्तर सारखेच आणि एकच आहे. ते म्हणजे, जेव्हा तुम्ही स्वामींचे भाषण ऐकता, त्यांचे वाङ्मय वाचता, भजन म्हणताना त्यांची किर्ती ऐकता, त्यावेळी तुमच्यामध्ये काय बदल घडत आहेत, याविषयी

तुम्हाला सजग राहायला पाहिजे. यामधूनच प्रश्नांचे उत्तर सापडते.

***

## प्रश्न क्रमांक ९२

आता मी दुसऱ्या प्रश्नाकडे वळतो.

आजकाल असे खूप लोक आपण 'साईबाबा' असल्याचा दावा करतात. एक माणूस म्हणतो, ''मी साईबाबा आहे, दुसरा एखादा साईबाबांसारखा पोशाख करतो आणि आपण साईबाबा असल्याचा दावा करतो. असाही एखादा असतो की त्याला साक्षात्कार झाल्याचे सांगतो. तो म्हणतो की मला आत्म्याचे खरे ज्ञान झाले आहे. आजूबाजूला घडणाऱ्या अशा घटनांमुळे आपल्या लक्षात येते की स्वामी देहाने आपल्यापासून दूर गेल्यावर आपण कशी प्रतिक्रिया द्यायला हवी ते समजलं पाहिजे. आपल्याला त्याबद्दल काय वाटतं? आपण कशी प्रतिक्रिया दिली पाहिजे? हा पुढचा प्रश्न आहे. मला त्याचे उत्तर देण्याची परवानगी असावी.

सर्वात प्रथम आपल्याकडे तीव्र हुशारी, तल्लखपणा असला पाहिजे. आपण भावनांच्या आहारी जाऊ नये. आपण वरवर विचार करू नये. नको! तीव्र हुशारी म्हणजे माझ्या मते योग्य-अयोग्य ठरवण्याची कुवत, प्रामाणिक शोध घेण्याची, देवत्वाची सत्यता पडताळून पाहण्याची वृत्ती असली पाहिजे. अशा तऱ्हेने आपण सुरुवात केली पाहिजे.

आपल्याला हेदेखील समजलं पाहिजे की स्वामींच्या अस्तित्वाने एखादा साक्षात्कार झाला म्हणजे मग तुम्हाला दुसऱ्या कोणाकडेही जायला नको. असं का? तुम्हाला दुसऱ्यांदा साक्षात्कार होऊ शकणार नाही. पहिला साक्षात्कार झाला की तो तुम्हाला सोडून जाणार नाही. तो कधीच दूर जात नाही. तुम्ही साक्षात्काराविना कधीच राहणार नाही. एकदा साक्षात्कार झाला की तो कायमचाच! म्हणून स्वामी म्हणाले आहेत, ''जेव्हा ज्ञान, हुशारी एकदा प्राप्त झाली की परत कधीही नाहीशी होत नाही. एकदा अज्ञान, अजाणतेपणा तुमच्यातून नाहीसा झाला की ते परतून येणार नाही. या गोष्टीची आपल्याला खात्री असली पाहिजे.

नंतर जे काही घडतं ते असं. आपण सर्वसामान्य आहोत. मी तुम्हाला सांगतो की आपण अगदी सामान्य होऊ या. काही लोकांना स्वत:चे खूप प्रदर्शन करावेसे वाटते आणि ते इकडे तिकडे धावपळ करून आपण किती महत्त्वाची व्यक्ती आहोत असे दाखवतात. त्याला आपण मोठेपणाचा बुरखा घेणे किंवा मोठेपणाच्या प्रदर्शनाची हाव, स्वत:च्या मोठेपणाची ओळख दाखवण्याची हौस असे म्हणूया. ओळखलं जाण्याची हौस असलेली अशी काही माणसं असतात. मी असं पाहिलंय की अशा या गोष्टी पुष्कळ लोकांच्यात निसर्गत:च आलेल्या असतात. पण आपण अशा गोष्टींना बळी पडू नये.

आध्यात्मिक जगतात आपण अगदी साधेपणाने राहिले पाहिजे. हेच गुपित आहे. जेव्हा आपण सामान्य असल्याची जाणीव निर्माण होते, तेव्हा खरोखर प्रत्येक गोष्ट कमालीची सुंदर दिसू लागते. तुम्ही तणावमुक्त होऊ शकता. विकास पावण्याची शक्यता निर्माण होते. अशा तऱ्हेचं स्वत:ला मोठं असल्याचं दाखवण्याचं वेड हे धर्माला किंवा अध्यात्माला धरून नाही. त्यामुळे तुमच्या विकासात अडथळा येतो. होय, तुम्हाला जराही सौंदर्य दिसणार नाही किंवा तुम्ही सतत तणावाखाली राहाल.

यापेक्षाही अजून एक मुद्दा असा आहे- जसं मी सुरुवातीलाच म्हटलं की काही जण स्वत:ला साक्षात्कार झाल्याचे दाखवतात. मला असं सांगायचं आहे की अशा तऱ्हेने साक्षात्कार झाल्याचं जाहीर करणं हा मोठ्या गुन्ह्यांपैकी एक गुन्हा आहे. कारण तुम्हाला खरोखर साक्षात्कार झालेला नसतो आणि तुम्ही साक्षात्कार झाल्याचा दावा करता. होय, तो गुन्हाच आहे आणि काही लोक एवढ्यावरच थांबत नाहीत, तर ते प्रत्येकाला सांगत सुटतात की त्यांना देवत्वाचा अनुभव आलेला आहे. आणि ते तुम्हाला साक्षात्कार मिळवून देण्यासाठी मदतही करतील. ही फारच मोठी फसवणूक आहे. आपण त्यात पडायला नको. ती फार वाईट गोष्ट आहे.

म्हणून दैवी साक्षात्कार ही दावा करण्याची गोष्ट नाही. जी जाहीर करण्याचीही गोष्ट नाही. ही तुम्ही अंगावर चढवण्याचा पोशाख नसतो. ती काही जाहिरात लावण्याची गोष्ट नाही. नाही. साक्षत्कार होणं हा तुमचा श्वास आहे. जागृतीची जाणीव होणं म्हणजेच साक्षात्कार होणं! प्रत्येकाला जाहीरपणे सांगत राहणं किंवा तुम्हाला साक्षात्कार मिळवून देण्यास मदत करणं अशी वचनं देत राहणं हा गुन्हा आहे. होय, ही फसवणूक आहे, गलीच्छपणा आहे. अशा माणसांच्या हातातलं भक्ष्य होऊ नये.

आणखी एक म्हणजे गंभीर, लांबट चेहऱ्याची ही माणसं स्वत: अशा थाटात बसून जाहीर करत असतात की त्यांना अत्युच्च साक्षात्कार प्राप्त झाला आहे. अशांपासून दक्ष व्हा, सावध राहा. ते तुमच्यासारख्यांना बनवत आहेत, फसवत आहेत.

आणखी म्हणजे जेव्हा मी या दृष्टीने पाहतो, अशा भोंदू, वेषधारी माणसांच्या शिकवणुकीकडे पाहतो, अशा तोतयाची वागणूक पाहतो, तेव्हा तो समजून न येणारा हिंसक गुन्हाच करत असतो. कारण तो तुमच्यावर परिणाम साधत असतो. त्याच्या

खोट्या वचनांनी, त्याच्या खोट्या देखाव्यांनी, खोट्या कृत्यांनी तो तुमच्याशी हिंसेने वागत असतो. ही हिंसा, दुष्टपणा, अदृश्य किंवा न जाणवणाऱ्या स्वरूपाची असते आणि अशा व्यक्ती खऱ्या गुन्हेगारांपेक्षाही अधिक गुन्हेगार असतात. कोणत्याही परिस्थितीत आपण त्यांना क्षमा करू शकत नाही.

अशा माणसांना स्वत:ला काही फायदा मिळतो का? ते तुमची संपत्ती बळकावतील, ते तुमचा नाश करतील, ते तुम्हाला लुटतील, तुमच्या अज्ञानाचा फायदा घेतील. पण पुढे काय होतं? तुम्ही पूर्णपणे फसवले गेलेले असता, तुमचा पूर्ण नाश झालेला असतो आणि मग दोनच गोष्टी उरतात. एक म्हणजे अशा खोट्या गोष्टी करणारा, खोटा दावा करणारा, पूर्णपणे स्वत: नाश पावतो. त्याचा कधीही विकास होत नाही. तो फक्त तुमच्यावर त्याच्या हातातलं बाहुलं झाल्याचा प्रचार करतो. तुम्ही एकवेळ फसवणुकीला माफ कराल, पण अशा भोंदू किंवा तोतया लोकांना माफ करू शकणार नाही. कारण ते तुमच्या भावनांशी खेळत असतात. ही गोष्ट सहन न करता येण्यासारखीच आहे, क्षमा न करण्यासारखीच आहे.

आणि काही लोकांना वाटतं की ते तुमच्या जीवनात साक्षात्कार घडवू शकतील. ते अशी कल्पना निर्माण करतात, ते अशा दैवी साक्षात्काराचे चित्र दाखवू लागतात, पण अशी खोटी कल्पना निर्माण करणं हे योग्य नाही. त्याचा तुम्हाला फायदा नाही, माझ्याही हिताचे नाही. अशा प्रकारचा साक्षात्कार होणं हे शक्य आहे का? नाही. कल्पना करण्याचा काहीही फायदा नाही.

आता मी सांगतो की स्वत:ची खरी ओळख झाल्याविना आत्मसाक्षात्कार होणार नाही. स्वत:ची खरी ओळख न होता तुम्ही असा दावा केलात तर तो गुन्हा ठरेल. आज तुम्हाला माझं म्हणणं कठोर वाटेल, पण आज जे जे घडत आहे, ते मी पाहतो, स्वामींच्या नावावर कितीतरी लोक खोटे दावे करत आहेत, खोट्या अफवा उठवत आहेत आणि दुर्दैवाने भक्त फसवले जात आहेत. ते त्यांच्या जाळ्यात अडकत आहेत असं मला त्यांच्याविषयी वाटतं.

खरं म्हणजे हा प्रश्न विचारला जावा, जो आत्मज्ञान झाल्याचे सांगतो, त्याला त्याच्या गुरुंकडे जाऊन त्यांच्यासमोर उभे राहण्यास सांगा. उदाहरणार्थ, कोणीही प्रशांति निलयममध्ये यावं, समाधीसमोर उभं राहावं आणि म्हणावं की मला उच्च प्रतीचं आत्मज्ञान झालं आहे आणि तो कुणालाही मदत करून साक्षात्कार देतील, त्यांनी यावं आणि अशा प्रकारचं भाषण करावं. कुणाच्यातही एवढे धैर्य नाही, हिंमत नाही.

खरोखर, हा मनाचा खेळ आहे. आपलं मन आपल्याला आकलन न होणाऱ्या गोष्टींचं आहे, हे आपल्याला कळत नाही. द्विधा मनाला एकत्व कधीही समजणार नाही. ते अशक्य आहे. काही लोक असं ठामपणे वचन देतात की हे २०२२ सालात घडणार आहे, २०२३ सालात हे घडणार आहे. पण नाही. माफ करा! कारण आपलं आतलं मत म्हणजे दिनदर्शिका नाही, आपलं मन म्हणजे जाणीवा नाहीत किंवा आपलं चैतन्य म्हणजेदेखील दिनदर्शिका नाही. ते अमर आहे, ते चिरस्थायी आहे.

म्हणून अशा ह्या खोट्या दाव्यांपासून सावध राहा.

***